**वाचले -**

१ आदेश क्रमांक - साप्रवि/३/कावि/७४९/२०२३ दिनांक ०६/०६/२०२३

२ आदेश क्रमांक प्रशा/२/कावि/७९५/२०१७ दिनांक ०१/११/२०१७

३ मा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे पत्र क्र.वैद्य/०१/कावि/४९०/२०२४ दिनांक ०८/०७/२०२४

४ सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक ०३/१२/२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८
क्र.साप्रवि/३अ/कावि/८९/२०२४
दिनांक ०३/१२/२०२४

**विषय : "ए.एन.एम" पदावरील परिविक्षाधिन कालावधी वाढविणेबाबत......**

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील "ए.एन.एम" या पदावर, खालील उमेदवारांस त्यांचे नावासमोर नमुद प्रवर्गातून पे लेवल एस ८ र.रु. २५५००-८११०० या वेतनश्रेणीमध्ये प्रथमत: १ वर्ष परिविक्षाधिन कालावधीसाठी नियुक्ती देण्यात आली आहे. तथापि परिविक्षाधिन कालावधी जरी १ वर्षाचा असला तरी जोपर्यंत त्यांची नियुक्ती नियमित केली जाणार नाही तो पर्यंत त्यांची नियुक्ती ही परिविक्षाधिनच राहील असे नियुक्ती आदेशात स्पष्टपणे नमूद करणेत आले आहे. सदरील कर्मचा-यांचा नियुक्तीचा प्रवर्ग, महापालिका रुजू दिनांक, परिविक्षाधिन कालावधी संपुष्टात आलेला दिनांक यांचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | कर्मचा-याचे नाव | नियुक्तीचा प्रवर्ग | महापालिका रुजू दिनांक | परिविक्षाधिन कालावधी संपुष्टात आलेला दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | श्रीम.साखरे मोहिनी मुकुंद | खुला | ०३/०७/२०२३ | ०२/०७/२०२४ |

श्रीम.साखरे मोहिनी मुकुंद यांचा परिविक्षाधिन कालावधी स्तंभ क्रमांक ०५ मध्ये नमुद केलेल्या दिनांकास संपुष्टात आलेला आहे तसेच नियुक्ती आदेशातील अटी व शर्ती नुसार त्यांनी संगणक अर्हता धारण केल्याचे प्रमाणपत्र व इंडियन / महाराष्ट्र फार्मासी कौन्सिलकडील नोंदणी केलेले अद्ययावत प्रमाणपत्र सादर केलेले आहे. श्रीम.साखरे मोहिनी मुकुंद ह्या परिविक्षाधिन कालावधीमध्ये प्रसुती रजेवर असल्याने त्यांच्या कामकाजाचे मूल्यमापन करता आलेले नाही.त्यामुळे श्रीम.साखरे मोहिनी मुकुंद यांचा परिविक्षाधीन कालावधी वाढविणेकामी विभागप्रमुखांनी उपरोक्त वाचले क्र.३ अन्वये शिफारस केलेली आहे. श्रीम.साखरे मोहिनी मुकुंद यांचा "ए.एन.एम" या पदावरील परिविक्षाधीन कालावधी वाढविणे आवश्यक आहे.

सबब मी उप आयुक्त, सामान्य प्रशासन विभाग, उपरोक्त वाचले क्र.२ अन्वये प्राप्त अधिकारानुसार मूळ नियुक्ती आदेशातील अटी व शर्तीचे अधीन राहून श्रीम.साखरे मोहिनी मुकुंद यांचा "ए.एन.एम" पदावरील परिविक्षाधीन कालावधी संपुष्टात आल्याचे दिनांकापासून पुढे १ वर्ष कालावधीकरिता म्हणजेच दि.०२/०७/२०२५ पर्यंत परिविक्षाधीन कालावधी वाढविण्यास या आदेशान्वये मान्यता देत आहे.

प्रस्तुत आदेशाची नोंद श्रीम.साखरे मोहिनी मुकुंद यांचा सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

उप आयुक्त,
सामान्य प्रशासन विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८

प्रति,
श्रीम.साखरे मोहिनी मुकुंद

प्रत :-

१.लेखा विभाग २.लेखापरीक्षण विभाग ३.सामान्य प्रशासन टेबल क्र. ७,१०,१२,२२ ४.साप्रवि संगणक कक्ष
५.पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघ ६. पिं.चि. मनपा सेवकाची सहकारी पतसंस्था
७.संबंधित विभागप्रमुख ८. वैद्यकीय मुख्य कार्यालय